## आयुष्य - बुद्धिबळाचा खेळ




वाचनाची आवड असल्यामुळे लहानपणी अनेक कथा, कादंबऱ्या, दिवाळी अंक, बालसाहित्य वाचनात आले. वेगवेगळया विषयांवरची कितीही पुस्तके वाचली तरी वाचनाची भूक कधी कमी होत नाही, उलट अधिकाधिक साहित्य वाचण्याचा मोह आवरता येत नाही.

असेच एके दिवशी यमुना खाडिलकर यांनी लिहिलेली 'पटावरील प्यादे' ही एक सत्यकथा वाचनात आली. पुस्तकाच्या मुखपृष्ठापासूनच आपली उत्कंठा वाढत जाते. आपले आयुष्य आणि बुद्धिबळाचा खेळ एकच. बुद्धिबळाची प्यादी आपापल्या चाली चालतात. त्यांचा वापर झाला की कोणीही त्यांना विचारत नाही. कोण राजा तर कोणी वजीर.

कथेची सुरूवात लेखिकेच्या जन्मापासून झाली आहे. कोल्हापूरातील त्यांच्या बालपणीच्या रम्य आठवणी, तेथील शालेय जीवन व परंपरा याचे सुरेख वर्णन केले आहे. बालपणीच त्यांच्या मनावर काही आघात झाले. त्यांच्या आईची व त्यांची काही काळासाठी ताटातूट झाली. नंतर त्यांच्या आयुष्यात अनेक स्थित्यंतरे आली. अनेक खडतर प्रसंगांना धैर्याने सामोरे जात असतानच अखेर मुंबईतील त्यांच्या आत्येकडील वास्तव्याने त्यांच्या पुढील जीवनाला नवीन कलाटणी दिली. शालेय शिक्षणाबरोबरच काँग्रेस हाऊस मधील सेविकादलात त्यांनी प्रवेश घेतला. वयाच्या तेराव्या वर्षी

स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रभातफेरी, पिकेटिंग, मिरवणुका, सूतकताई ह्यांत त्या उस्फूर्तपणे सहभागी होत. त्या उत्कृष्ट खेळाडूही होत्या. त्यांच्यात असलेला सभाधीटपणा त्यांना पुढील आयुष्यात समाजकार्यासाठी फार उपयोगी पडला.

नाट्याचार्य व थोर देशभक्त कै. काकासाहेब खाडिलकर यांच्या प्रतिष्ठित घराण्यात वयाच्या सोळाव्या वर्षी सून म्हणून त्यांचे पदार्पण झाले व त्यांच्या आयुष्याला नवीन कलाटणी मिळाली. प्रेमळ सासू-सासरे ह्यांनी त्यांना घडवले व पुढील आयुष्याच्या वाटचालीत त्यांना त्याचा फार फायदा झाला. कुटुंबाच्या वृत्तपत्र व्यवसायात अनेक चढउतार आले तसेच कुटुंबातील सदस्यांवर बिकट प्रसंग आले पण त्यांनी लहान वयातच सर्व जबाबदारी व कर्तव्य निष्ठेने पार पाडले. तरूणपणात त्यांना वैधव्य आले पण काकासाहेबांनी आपले पुत्रवियोगाचे दुःख बाजूला सारत, त्यांनाच (सुनेला) मुलगा मानून पुढील शिक्षणासाठी प्रवृत्त केले. त्या बी.ए. पदवीधर झाल्या. शिक्षणाने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. त्या स्वावलंबी झाल्या. आपल्या शिक्षणाचा त्यांनी वृत्तपत्र व्यवसायासाठी उपयोग केला. कधीही पैशाचा मोह न करता, सदैव कुटुंबासाठी त्या झटल्या. कितीही अवहेलना व कुचेष्टा झाली तरीही त्या प्रामाणिकपणे व निःस्वार्थीपणे आयुष्यभर वागल्या. आपल्या घराण्याची प्रतिष्ठा अखेरपर्यंत त्यांनी जपली. त्यांच्या दीराने त्यांना आपल्या बहिणीप्रमाणे मानले व सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहिले.

लेखिकेने आपली सामाजिक बांधिलकी जपली. गिरगाव जनता केंद्राद्वारे अनेक समाजोपयोगी उपक्रम त्यांनी सुरू केले. त्यांच्या सामाजिक कार्याच्या गौरवार्थ त्यांना 'पद्मश्री' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आयुष्यात बरे-वाईट अनुभव त्यांना आले. खूप दुःख त्यांनी भोगलं, खूप काही सोसलं. अनेकवेळा मानसिकदृष्ट्या कोलमडून पडल्या पण पुन्हा नव्याने ताठ उभ्या राहिल्या, एक नवी झुंज देण्यासाठी.. आपण सर्वच जण आयुष्याच्या बुद्धिबळातील प्यादीच तर आहोत..

**दर्शना प्रभूतेंडोलकर**